जा.क्र.८/आशा/प्रलि/पोशि/भरती-१९/ 6655/२१
पोलीस अधीक्षक यांचे कार्यालय, सिंधुदुर्ग,सिंधुदुर्गनगरी.
दूरध्वनी क्रमांक-०२३६२-२२८२००/२२८००८
फॅक्स क्रमांक -०२३६२-२२८२०५
E-Mail - sp.sindhudurg@mahapolice.gov.in
दिनांक :- १८/१०/२०२१

---

## सिंधुदुर्ग जिल्हा पोलीस शिपाई भरती-२०१९

१. सिंधुदुर्ग जिल्हा पोलीस शिपाई भरती-२०१९ करिता लेखी परीक्षा दिनांक १८/१०/२०१९ रोजी घेण्यात आली असून, सदर परीक्षेची अंतरिम उत्तर तालिका प्रश्नसंच निहाय (A,B,C,D) प्रसिध्द करण्यात येत आहे.

२. सदर अंतरिम उत्तर तालिकेनुसार लेखी परीक्षेमध्ये सर्व हजर उमेदवारांना प्राप्त झालेल्या गुणांचा तक्ताही प्रसिध्द करण्यात येत आहे.

३. सदरचा गुणतक्ता हा गुणवत्ता यादी नसून सर्व हजर उमेदवारांना लेखी परीक्षेत प्राप्त झालेल्या गुणांची यादी आहे.

४. प्रश्नपत्रिकेमधील पुढे नमुद दोन प्रश्नांचे गुण तांत्रिक कारणामुळे सर्व परीक्षार्थींना देण्यात आलेले आहेत. सेट-A मधील प्रश्न क्र.२६ व ९५, सेट-B मधील प्रश्न क्र.२७ व ८५, सेट-C मधील प्रश्न क्र.१४ व ६१ आणि सेट-D मधील प्रश्न क्र.३३ व ६०

५. उमेदवारांना प्राप्त गुणांबाबत काही आक्षेप असल्यास त्यांनी लेखी अर्ज, OMR उत्तरपत्रिका, प्रश्नपत्रिका व इतर पुरावे यांच्यासह दिनांक १९/१०/२०२१ ते २१/१०/२०२१ रोजी सकाळी १०.०० ते १८.०० वा पर्यत पोलीस भरती मदत कक्ष, पोलीस अधीक्षक कार्यालय सिंधुदुर्ग येथे प्रत्यक्ष येऊन सादर करावा. त्यानंतर येणाऱ्या आक्षेपांची दखल घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी. आक्षेप अर्ज लेखी स्वरुपात समक्ष सादर करावेत. इतर मार्गाने प्राप्त आक्षेपांची दखल घेतली जाणार नाही.

६. उमेदवारांकडून प्राप्त आक्षेपाअंती अंतिम उत्तर तालिका व गुणतक्ता जाहीर करण्यांत येईल.

७. लेखी परीक्षेमध्ये मिळालेल्या गुणांच्या आधारे पात्र ठरलेल्या उमेदवारांपैकी सामाजिक आरक्षण व समांतर आरक्षण निहाय १:१० प्रमाणातील यादी लवकरच www.mahapolice.gov.in व sindhudurgpolice.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

८. त्यानंतर पात्र उमेदवारांची कागदपत्र पडताळणी, शारीरिक पात्रता व शारीरिक चाचणी घेण्यात येणार आहे. त्याचे वेळापत्रक स्वतंत्ररित्या लवकरच जाहीर करण्यात येईल. यास्तव उमेदवारांनी वर नमुद संकेतस्थळांवर तपासणी करत रहावे. तसेच अधिकृत ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांकावरील एसएमएस तपासत रहावेत.

SUPERINTENDENT OF POLICE SINDHUDURG

( राजेंद्र दाभाडे )
पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग.
तथा अध्यक्ष सिंधुदुर्ग जिल्हा पोलीस भरती-२०१९